**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ४३/२०१६-१७/४४ दिनांक: ०२.०२.२०१७

**आदेश**

**आदेश केस क्र. ४३/२०१६-२०१७**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. विठ्ठल यशवंतराव भोसले :<br>मु. पो. डळफळापूर<br>ता. जत, जिल्हा. सांगली | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली. | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठेमहांकाळ | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग जत | |

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

१) तक्रारदार श्री विठ्ठल यशवंतराव भोसले, रा. डफळापूर, ता. जत. जि. सांगली (ग्राहक क्रमांक २७१०००१०२७३७ यांनी प्रस्तुत गा-हाणे त्यांचे प्रतिनिधी श्री हरिभाऊ दि. खापरे, यांचेमार्फेत त्यांच्या गट क्र.२४४ या जमिनीमध्ये कृषि पंपासाठी नविन वीज जोडणी मिळणेबद्दल आणि भरपाई मिळणेबद्दल दि. २६-१२-२०१६ रोजी या मंचाकडे दाखल केले आहे.

२) यापूर्वी दि. ०५-१०-२०१६ रोजी तक्रारदार यांनी अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. तो सदर कक्षाने "अर्जदाराचे शेती पंप कनेक्शन केबलद्वारे दिनाक १२.१०.२०१६ रोजी दिले आहे. त्यामुळे तक्रार निकाली काढण्यात येत आहे" असा दि. ०३-१२-२०१६ रोजी आदेश करुन निकाली काढला.

३) वि.प. यांनी म्हणणे दाखल करुन तक्रारदार यांना दि. २२.१०.२०१२ रोजी केबल कनेक्शनद्वारे वीज जोडणी देणेत आली होती व सध्या त्यांना दोन पोलची लघुदाब वाहिनी तयार करुन विज पुरवठा जोडणेत आला आहे असे नमूद केले आहे.

४) आज या प्रकरणाच्या सुनावणीचे वेळी तक्रारदार यांचे प्रतिनिधी श्री हरिभाऊ खापरे आणि वि.प. तर्फे कार्यकारी अभियंता दराडे हजर होते. तक्रारदार यांचे प्रतिनिधी श्री खापरे यांनी कृषिपंपासाठी वीज जोडणी मिळाली असून तक्रारदार यांची अन्य कोणतीही मागणी अगर तक्रार नसल्यामुळे हे प्रकरण निकली काढणेत यावे अशी या मंचास समक्ष तोंडी विनंती केली आहे.

५) या गा-हाण्यामधील वादाचा विषय वरील प्रमाणे संपुष्टात आला असल्यामुळे सदर गा-हाणे तक्रारदारतर्फे प्रतिनिधी यांच्या विनंतीनुसार निकाली काढणेत येत आहे. त्याबाबतचा आदेश खालील प्रमाणे.

**आदेश**

१) तक्रारदार श्री विठ्ठल यशवंतराव भोसले रा. डफळापूर ता. जत. जि. सांगली यांना त्यांच्या मागणीनुसार कृषिपंपासाठी वीज जोडणी मिळाली असल्यामुळे आणि त्यांची अन्य कोणतीही मागणी राहिली नसल्याने प्रस्तुत प्रकरण निकालात काढणेत येत आहे.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |